ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली

दिनांक :– १९.१२.२०२४

**प्रेसनोट**

**आरोपी लोकसेवक श्री अजय दशरथ पहारे, (कंत्राटी), ऑपरेटर घरकुल विभाग, पंचायत समिती कार्यालय ता.औढा ना. जि हिंगोली रा.आनंद नगर, अकोला बायपास, आनंदी रेस्टॉरंटचे पाठीमागे, हिंगोली यांनी तक्रारदार यांचेकडून २,०००/–रू. लाचेची मागणी करून दिनांक १९.१२.२०२४ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान २,०००/– लाचेची रक्कम स्विकारल्याने त्याचे विरूध्द पोस्टे औढा. जि.हिंगोली येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.**

---

दिनांक ११.१२.२०२४ रोजी यातील तक्रारदार यांनी ला.प्र.वि.हिंगोली येथे तक्रार दिली होती की, तक्रारदार व त्यांचे वडीलांचे नावे शबरी घरकुल आवास योजने अंतर्गत घरकुल मंजुर झाले असून सदर घरकूलाचे बांधकाम करण्यासाठी पहीला हप्ता प्रत्येकी १५,०००/–रू. प्रमाणे तक्रारदार व त्याचे वडीलांचे बॅक खात्यावर जमा करण्यासाठी २,०००/–रू.लाचेची मागणी केल्याची तक्रार दिली होती. तक्रादार यांचे तक्रारीची दि.११.१२.२०२४ रोजी लाचमागणी पडताळणी केली असता अजय दशरथ पहारे, ऑपरेटर यांनी पंचासमक्ष २,०००/– रू लाचेची मागणी करून २,०००/– रू. लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दिल्याचे निष्पन्न झाले त्यावरून आज दिनांक १९.१२.२०२४ रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्याण पंचासमक्ष अजय दशरथ पहारे, यांनी २,०००/– रू. लाच रक्कम घरकुल विभागात पंचायत समीती कार्यालय औंढा ना. येथे स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले.

त्यावरून अजय दशरथ पहारे, **कंत्राटी ऑपरेटर घरकुल विभाग, पंचायत समिती कार्यालय ता.औढा ना. जि हिंगोली रा.आनंद नगर, अकोला बायपास, आनंदी रेस्टॉरंटचे पाठीमागे, हिंगोली** यांचे विरूध्द पोलीस स्टेशन औढा ना जि. हिंगोली येथे कलम ७, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ही कामगिरी श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, डॉ. संजय तुंगार, अपर पोलीस अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, श्री विकास घनवट, पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली यांचे मार्गदर्शना खाली, श्री.विनायक जाधव, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांनी पोहेकॉ श्री तान्हाजी मुंढे, ज्ञानेश्वर पंचलींगे, भगवान मंडलीक, पोकॉ शिवाजी वाघ, चापोना श्री शेख अकबर अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**श्री. संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मो.नं. ९५४५५३१२३४**

**श्री. विकास घनवट, पोलीस उप अधीक्षक, मो.नं.९८२२२५९९३२**

**टोल फ्री क्र.–१०६४, दुरध्वनी क्र.०२४५६–२२३०५५**

19/12

विकास घनवट
पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली.